# कमला महाविद्यालयात चर्चासत्र

कोल्हापूर : कमला महाविद्यालयातील क्रांतिवीर रंगरावदादा पाटील ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ कॉलेज लायब्ररीयन असोसिएशनतर्फे (सुक्ला) 'मार्केटिंग स्ट्रॅटेजिस् टू प्रमोट लायब्ररी इन डिजिटल एरा' यावर राष्ट्रीय चर्चासत्र झाले. ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर युनिव्हर्सिटीच्या डॉ. शालिनी लिहितकर यांना आमंत्रित केले. परांडाचे (उस्मानाबाद) एस. जी. आर. जी. शिंदे महाविद्यालयातील ग्रंथपाल डॉ. राहुल देशमुख उपस्थित होते. प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी कमला कॉलेजच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच ग्रंथालये ही ज्ञानाचे भांडार असून त्याचा वापर सर्वांनी करणे आवश्यक आहे, असे सांगितले. शिवाजी विद्यापीठ कॉलेज लायब्ररीयन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. रवींद्र आढाव यांनी सुक्ला संघटनेची भूमिका भूमिका स्पष्ट केली. चर्चासत्राच्या समन्वयक ग्रंथपाल उर्मिला कदम यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आढाव यांनी आभार मानले. डॉ. नीता धुमाळ यांनी सूत्रसंचालन केले.

Scanned by CamScanner